0068618

FORM-1A

N.C.R.B. I.I.F.-I

## पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य महाराष्ट्र State, जिल्हा मुंबई District, पोलीस ठाणे (मा प्र वि) Police Station, पहिली खबर क्र. 37 FIR No., वर्ष 2023 Year, दिनांक 05/12/23 Date

2. (i) अधिनियम Act अत्याचार प्रतिबंध अधिनियम, कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act 1988, कलमे Sections
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार सोमवार, तारीख पासून 04/12/23, वेळ 15.30 वा. तारीख पर्यंत 04/12/23, वेळ 20.20 वा.
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 04/12/23, वेळ Time
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 03/23, तारीख Date 05/12/23, वेळ Time 06.20

4. माहितीचा प्रकार Type of Information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र.
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S., Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name मानखुर्द पोलीस ठाणे, मुंबई. ठिकाणाचे नंबर No. if any, गल्ली Ward, रस्त्याचे नाव Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, तालुका Taluka, जिल्हा Dist., राज्य State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station, तालुका Taluka, जिल्हा Dist., राज्य State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name महमद रफीक खत्री, (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name अब्दुल रहीम खत्री
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 37 वर्षे, (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. 8652605253
   (e) पारपत्र क्रमांक Passport No., दिल्याचा दिनांक Date of Issue, दिल्याचे ठिकाण Place of Issue, (f) व्यवसाय Occupation
   (g) धर्म Religion मुस्लीम, जात Caste, जनजात Sub-Caste
   (h) पत्ता Address :, गल्ली / सर्व्हे नं. Ward, घर / नाव नं. House/Name No., फोन / मो. नं. Phone/M. No., पॅन नं. PAN No., वोटर्स नं. Card No.
   रस्त्याचे नाव Road, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, पो. स्टे. P. Stn.: दुसरा माळा, शॉपिंग, 225 बिल्डींग नं. 62,
   तालुका Taluka, जिल्हा Dist., राज्य State: लल्लुभाई कंपाऊंड मानखुर्द, मुंबई. सध्याचा पत्ता Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

लाचखोर प्रदिप राजाराम फडतरे वय 57 वर्षे ( पोलीस शिपाई 06.1689 मानखुर्द पोलीस ठाणे ( रा.ठी. हॅप्पी होम को.ऑ.हौ.सोसा. बिल्डींग नं. D/128 रूम नं. 0/2 से.26 वाशी, नवी मुंबई.



Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी महमद रफिक अब्दुल रहीम खत्री वय 37 वर्षे धंदा- कन्स्ट्रक्शन रा.डी. दुसरा माळा, सी-विंग, 225 बिल्डींग नं. 62, लल्लुभाई कंपाऊंड मानखुर्द मुंबई 43. यांचा स्वतंत्र पानावर जबाब नोंद करण्यात आला असून त्यास नमुद गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष

Pratibha

( प्रतिभा लोंढके )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

नि.डा.अं.

महमद रफिक अब्दुल रहिम खत्री

जबाब

दि. ०४/१२/२०२३

श्री. महमद रफीक अब्दुल रहीम खत्री, वय ३७ वर्षे, धंदा– नोकरी, रा.ठि.– दुसरा माळा, सी विंग, २२५,बिल्डीग नं. ६२, लल्लुभाई कंपाउंड, मानखुर्द, मुंबई ४०००४३, मो.क्र. ८६५२६०५२५३

-----•-----

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर रहावयास आहे. मी आयण्णा स्वामी यांचे नावे असलेल्या कंस्ट्रक्शन साईटवर चेंबुर, मुंबई येथे काम करीत असुन त्यातुन मिळणारे उत्पन्नावर माझा उदरनिर्वाह करीत आहे.

दि. २७/११/२०२३ रोजी बिलारा देशी बार, मानखुर्द येथे मी व माझे दोन मित्र नामे राजू वडारी, वसंत यांच्यासमवेत रात्रौ १०.०० वा चे सुमारास दारु पिण्यासाठी गेलो होतो. माझा मित्र वसंत व बार मॅनेजर यांच्यात काही कारणावरुन बाचाबाची झाली. त्यामुळे मी मध्यस्थी म्हणून काय झाले असे विचारण्याकरीता गेलो असता बार मॅनेजरने माझेसोबत हुज्जत घातली त्यामुळे आमच्यात वादावादी झाली आणि आम्ही तेथून निघून गेलो. दुस–या दिवशी मला माझे मो. क्र. ८६५२६०५२५३ याचेवर दुपारी २ वाजण्याचे सुमारास मानखुर्द पोलीस ठाणे येथून तात्या नाव असलेल्या पोलीस हवालदार ( मला त्यांचे पूर्ण नाव माहीत नाही, तात्या नावानेच त्यांना ओळखतात) यांचा मो. क्र. ०९७७३०७७१४९ याचेवरुन फोन आला व त्यांनी मला सायंकाळी ०४.०० वा पोलीस ठाणेस येण्यास सांगितले. तेथे गेल्यानंतर तीन स्टार ऑफीसर आंबेकर साहेब व तात्या हवालदार तेथे होते, तात्या हवालदार यांनी मला बिलारा बार येथे झालेल्या भांडणाबाबत विचारणा केली व बार मॅनेजर यांनी तुमच्याविरुदध तक्रार केली आहे असे सांगून आता मोठया केसमध्ये तुझे नाव टाकून आता तुला आत टाकणार आहे असे सांगितले. यावेळी मला माफ करा, पुन्हा माझ्याकडून असे होणार नाही असे मी त्यांना सांगितले असता तात्या हवालदार यांनी केसमध्ये नाव टाकायचे नसेल तर रु. २०,०००/– आणून दे असे म्हणाले. त्यानंतर मी मला खाली सोडा, मी काहीतरी जुळवाजुळव करुन देतो असे म्हणालो व तेथून बाहेर पडलो. त्यानंतर तात्या हवालदार यांचा मला दि. ३०/११/२०२३ रोजी पुन्हा माझे वरनमूद मोबाईल क्रमांकावर त्यांच्या वरनमूद मोबाईल क्रमांकावरुन कॉल येत होता परंतू मी उचलला नाही. त्यानंतर दि. ०३/१२/२०२३ रोजी मला पुन्हा माझे मो. क्र. ८६५२६०५२५३ याचेवर दुपारी १ वाजण्यचे सुमारास हवालदार तात्या यांचा मो. क्र. ०९७७३०७७१४९ याचेवरुन फोन आला, त्यावेळी मी त्यांना उदया येईन असे सांगितले.

मला मानखुर्द पोलीस ठाण्याचे तीन स्टार ऑफीसर आंबेकर साहेब व तात्या हवालदार यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दि. ०४/१२/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथील कार्यालयात गेलो व तेथील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो असता त्यांनी मला पो.नि. प्रतिभा तांदळे मॅडम यांचे कार्यालयात पाठविले. पो.नि. तांदळे मॅडम यांनी माझेकडुन तीन स्टार ऑफीसर आंबेकर साहेब व तात्या हवालदार यांचे विरोधात लाचेची मागणी करीत असलेबाबतचा तक्रार अर्ज स्वहस्ताक्षरात लिहून देण्यास सांगितले असता मी मला लिहिता वाचता येत नसल्याचे सांगितले. मला मराठी लिहिता वाचता येत नसल्याने पो.नि. प्रतिभा तांदळे मॅडम यांनी मी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे मराठी भाषेमध्ये अर्ज स्वत: कॉम्प्युटरवर टंकलिखित करून त्याची प्रिंट काढून मला मराठीतून वाचून हिंदीतुन समजावुन सांगितला व त्यावर माझी सही घेतली. त्यानंतर पो.नि. प्रतिभा तांदळे मॅडम या मला पो.नि.चौगुले यांच्याकडे घेवुन गेले. तेथे माझी पो.नि.चौगुले व तेथे उपस्थित असलेले दोन शासकीय पंचांशी आणि उर्वरीत पोलीस पथकाशी माझी ओळख करून दिली. पो.नि. प्रतिभा तांदळे यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. प्रतिभा तांदळे मॅडम यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि. प्रतिभा तांदळे मॅडम यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पो.नि तांदळे मॅडम यांनी पंचांसमक्ष मानखुर्द पोलीस ठाण्याचे तीन स्टार ऑफीसर आंबेकर साहेब व तात्या हवालदार यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. त्यानंतर पो.नि. तांदळे मॅडम यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एसडी कार्डमध्ये प्रथम स्वत:चे, माझे व पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्याचदरम्यान मला मानखुर्द पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार तात्या यांचे मोबाईल क्र. ०९७७३०७७१४९ वरून फोन आला असता पो.नि तांदळे यांनी मला फोन न घेण्याबाबत सुचना दिल्या.

नि.डा.अं.

महमद रफिक अब्दुल रहिम खत्री

Scanned with OKEN Scanner

त्यानंतर पो.नि. तांदळे मॅडम यांनी मला सांगितले की, माझे मोबाईल वरून मानखुर्द पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार तात्या यांना फोन करणार असुन, त्यावेळी मोबाईल फोनचा स्पिकर ऑन करून संभाषण केले जाईल ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एसडी कार्डमध्ये ध्वनिमुद्रीत केले जाईल असे सांगितले. त्याप्रमाणे पो.नि. तांदळे यांनी पोलीस पथकातील श्री. गायकवाड यांचे मदतीने सदर डिजीटल व्हाईस रेकॉडर चालू करून माझे ताब्यात दिला. पो.नि. तांदळे मॅडम यांनी सांगितल्याप्रमाणे मी पंचांसमक्ष माझा मोबाईल क्र. ८६५२६०५२५३ वरून पोलीस हवालदार तात्या यांचा मोबाईल क्र. ०९७७३०७७१४९ वर फोन केला व माझेकडील मोबाईल फोनचा स्पिकर ऑन केला. नमुद संभाषणादरम्यान पोलीस हवालदार तात्या यांनी माझेकडे मला अटक न करण्याकरीता रू. २०,०००/– लाचेची मागणी केली व व तडजोडीअंती रू. १०,०००/– लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

पो.नि. तांदळे मॅडम यांनी मानखुर्द पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार तात्या यांनी पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व लाचेची रक्कम तात्काळ मागणी केली असल्याने त्वरीत सापळापुर्व/सापळा कारवाई करावयाची असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि. तांदळे मॅडम यांनी माझेकडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. १०,०००/– बाबत विचारणा केली असता मी त्यांना माझे बचतीमधील रू. १०,०००/– (रू. ५०० दराच्या २० भारतीय चलनी नोटा) दिल्या. पो.नि. तांदळे मॅडम यांनी माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. १०,०००/– (रू. ५००/– दराच्या २० भारतीय चलनी नोटा ) ताब्यात घेतल्या. त्यानंतर नमुद नोटांच्या छायांकित प्रती लाप्रवि कार्यालयाच्या झेरॉक्स मशिनवर काढुन घेतल्या.

त्यानंतर पो.नि. तांदळे मॅडम यांनी मला सापळापुर्व/सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. त्यानंतर ब्युरो कार्यालयाचे गोपनिय कक्षात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावून सदरची रक्कम माझे शर्टाच्या वरील डाव्या खिशात ठेवली. पो.नि. तांदळे मॅडम यांनी मानखुर्द पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार तात्या यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझे उजव्या हातातील धातुचा कडा हातातुन बाहेर काढुन तो डाव्या हातात घालावा व कडा फिरवुन पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. तसेच पंच श्री. लाऊतकर यांना देखील आरोपी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारताच त्यांनी त्यांचा उजव्या हाताने थम करून पुर्वनियोजीत इशारा करावा असे पो.नि तांदळे मॅडम यांनी सांगितले.

त्यानंतर पो.नि. तांदळे मॅडम यांनी माझी सापळा पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून घाटकोपर पोलीस ठाणेच्या हद्दीतील छेडा नगर बस स्टॉप येथ आलो. त्यावेळी पो.नि. तांदळे मॅडम यांनी पथकातील पोलीस अंमलदार श्री. गायकवाड याचे मार्फतीने माझे शर्टचे आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून सापळा कारवाईकरीता लोकसेवक यांचे मानखुर्द पोलीस ठाणे येथील कार्यालयात मला पंचासोबत रिक्षाने पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक हे देखील रिक्षाने मानखुर्द पोलीस ठाणे येथे आले. मी लोकसेवक पोलीस हवालदार तात्या कार्यरत असलेल्या दुसऱ्या मजल्यावरील त्यांच्या कार्यालयाजवळ गेलो असता लोकसेवक पोलीस हवालदार तात्या हे त्यांचे कार्यालयात उपस्थित होते. लोकसेवक पोलीस हवालदार तात्या यांनी मला केबीनच्या बाहेर थांबण्यास इशारा केला. त्यानंतर ते केबीनच्या बाहेर आले व आमची कामासंदर्भात चर्चा झाली त्यावेळी लोकसेवक पोलीस हवालदार तात्या यांनी " कितना साहबने बोला है... बीस बोला है ना... कितना दे रहा है तु... अशी विचारणा केली असता मी त्यांना " दस लाया दो... तीन तो बचाने दो मेरेको भाई... पाच... सात मे करा दोना ऐसा मत करोना..., असे सांगितले असता लोकसेवक तात्या यांनी " पाच... सात मे नही होता चल... पंधरा मे कर चल... असे मला सांगितले त्यावर मी त्यांना " अरे पर लाया हि नही पंधरा..., असे सांगितले त्यावर लोकसेवक तात्या यांनी " अभी दस दे... चार... पाच दिन के बाद साहब को मै पकड लुंगा... साहब को मै बोलता हु चल... साहब को बोलता हु तुम लाया है बोलता हु...असे मला सांगितले. त्याचवेळी एका इतर लोकसेवक यांनी " साहबने बुलाया था ना... अब क्यु इतना मचांड कर रहा है उपर से लेके आया पंधरा... बीस हजार दे दोना... असे मला सांगितले असता मी त्यांना "नही कहा पंधरा... बीस हजार...मै दस हजार...लेके आया हू असे सांगितले. त्यावेळी इतर लोकसेवक यांनी " दस मे थोडी होगा गोलुभाई... पहिले का मेरे साडे तीन हजार तुम्हारे पास है... त्यावर मी " बस करोंना अभी क्या करेंगे... अंबेकर साहब..., त्यावेळी लोकसेवक अंबेकर यांनी " नही... नही वो तात्या क्या बोल रहा है देख... मेरेको हाथ पैर पडता है...असे सांगितले असता लोकसेवक तात्या यांनी " अभी दस कर... चार... पाच दिन में साहब का पाच और वो पाच ऐसा दे दे... नही तो अगलीबार साहब के पाच लाके दे दे पाच का मै कम कर दुंगा साहब को ऐसा

निडाअं.

महमद रफिक [illegible]

Scanned with OKEN Scanner

वैसा बोलके अभी दस दे दे... असे सांगुन त्यांनी माझेकडे लाचेची रक्कमेची मागणी केली असता मी माझे कडील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम १०,०००/– (रू. ५००/– दराच्या २० भारतीय चलनी नोटा ) लोकसेवक याच्या उजव्या हातात दिली असता त्यांनी ती स्विकारून त्यांच्या पँटच्या उजव्या खिश्यामध्ये ठेवली. माझे सोबत असलेले पंच श्री. लाऊतकर यांनी आरोपी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारताच त्यांनी त्यांचा उजव्या हाताने थम करून पोलीस पथकास पुर्वनियोजीत इशारा केला असल्याचे मी पाहिले. मानखुर्द पोलीस ठाण्याचे तीन स्टार ऑफीसर आंबेकर साहेब हे मला अटक करतील या भीतीपोटी मी तात्काळ पोलीस स्टेशनच्या बाहेर निघुन गेलो. त्यानंतर काहि वेळाने पो.नि. चौगुले यांनी माझे मोबाईल फोनवर फोन केला व मला लोकसेवक यांचे कार्यालयाच्या ठिकाणी बोलाविले. मी लोकसेवक याच्या कार्यालयात गेलो असता पोलीस पथकाने पोलीस हवालदार तात्या यास रू. १०,०००/– (रू. ५००/– दराच्या २० भारतीय चलनी नोटा ) लाचेच्या रक्कमेसह रंगेहात ताब्यात घेतले असल्याचे मी पाहिले.

सदर वेळी पोलिसांनी त्या लोकसेवकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे संपुर्ण नाव श्री. प्रदिप राजराम फडतरे, पो.शि.क्र. ०६.१६८९, मानखुर्द पोलीस टाणे, मुंबई, रा.ठि.– हॅप्पी होम को.ऑप. सोसा. सेक्टर २६, बिल्डिंग क्र. डी/१२८, रूम क्र. ०/२, सेक्टर २६, वाशी, नवी मुंबई असे असल्याचे मला, पंचाना व पोलिस पथकास समजले.

तरी, मानखुर्द पोलीस ठाणे, मुंबई येथे कार्यरत असलेले श्री. प्रदिप राजराम फडतरे उर्फ तात्या, पो.शि.क्र. ०६.१६८९, यांनी मला बिलारा देशी बार, मानखुर्द येथे मी व माझे दोन मित्र नामे राजू वडारी, वसंत यांच्यासमवेत दारू पिऊन बार मॅनेजर सोबत झालेल्या भांडणाबाबत विचारणा केली व बार मॅनेजर यांनी तुमच्याविरुदध तक्रार केली आहे असे सांगून मोठया केसमध्ये तुझे नाव टाकून तुला आत टाकणार असे सांगितले. अटक न करण्याकरीता, माझेकडे रू.२०,०००/– रक्कमेची लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. १०,०००/– स्विकारली म्हणुन माझी त्याचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

मानखुर्द पोलीस ठाणे, मुंबई येथे कार्यरत असलेले श्री. प्रदिप राजराम फडतरे उर्फ तात्या, पो.शि.क्र. ०६. १६८९, यांचेशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत.

माझा वरील जबाब हा मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केला असून तो मला मराठीतुन वाचून हिंदीतुन समजावुन सांगितला असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( प्रतिभा तांदळे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

नि.डा.अं.

महमद रफिक अब्दुल रहिम खत्री

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदार / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. दाखल गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) दाखल गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ लाचेची रक्कम रु.10,000/-

Total Value of properties stolen / involved

(b) दाखल मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी कॉलम क्र.7 मधील आलोसे यांनी तक्रारदार यांना त्यांचेवर मानखुर्द पो.ठाणे येथे दाखल NC वरून मोठ्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देऊन त्यात न अडकवण्यासाठी तक्रारदार यांचेकडे 20,000/- रुपयांची मागणी करून तडजोडी अंती 10,000/- रुपये लाच स्विकारताना रंगेहात पकडल्याने त्यांचेवर कलम 7. भ्र.प्र. अधिनियम अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो.नि. प्रतिभा तांदळे

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण.

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........ District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.) नि.डा.अं.

14. तक्रारदाराची सही व अंगठा — महमद शफिक अब्दुल रहिम खत्री

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ........ प्रतिभा तांदळे

पदनाम Rank........ पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख........

1. Date and time of submitted to the Court.

Posting

Code No. of I. O. ........

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner